**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २१२ वा ● शुक्रवार २२ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 212 | Date : 22/12/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## बार्शी-धाराशिव मार्गावर एसटी बस आणि दुचाकीचा भीषण अपघात; तिघांनी जागीच गमावले प्राण



सोलापूर : बार्शी-धाराशिव मार्गांवरील तांदुळवाडी काल (गुरुवारी) एसटी बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील तीन तरुणांचा मृत्यू झाला असून तिनही तरुण गाडी खाली चिरडून जागीच ठार झाले आहेत. बार्शी-धाराशिव मार्गांवरील तांदुळवाडी येथे झालेल्या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. काल संध्याकाळच्या सुमारास एसटी बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील तीन तरुण गाडी खाली चिरडून ठार झाले. कार्तिक यादव, ओंकार पवार, ओम आतकरे अशी तीन तरुणांची नावं आहेत. हे तिघेही धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी होते. हे तिघे मित्र धाराशिवहून बार्शीकडे निघाले होते. यावेळी पुण्याहून धाराशिवकडे निघालेली एसटी बस आणि दुचाकीचा तांदुळवाडी येथे भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की दुचाकीवरील तिनही तरुण एसटी बस खाली अडकले. एका तरुणाचं शीर हे शरीरापासून वेगळं झालं. तर इतर दोघे जवळपास ५० फूटांपर्यंत फरफटत गेले. घटनेची माहिती मिळताच तांदुळवाडीतील ग्रामस्थ मदतीला धावून आले. त्यांनी बसमधील काही जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत.

## प्रत्येक सिलेंडरवर 'या' ग्राहकांना मिळणार ४०-४० रुपयांची सूट



मुंबई : LPG सिलेंडर (LPG Cylinder) ग्राहकांसाठी आनंदाची बातमी. सरकारी तेल विपणन कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती (LPG Cylinder Prices) कमी केल्या आहेत. यानंतर आता १९ किलोंच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या ग्राहकांना प्रत्येक सिलेंडरवर सुमारे ४० ते ४० रुपयांचा नफा मिळणार आहे. तर घरगुती एलपीजी सिलेंडरच्या बाबतीत, किंमतीत कोणताही बदल झालेला नाही. सरकारी तेल विपणन कंपन्यांनी म्हणजेच, OMC Z§ 19 किलो LPG सिलेंडरची किंमत ३९.५० रुपयांनी कमी केली आहे. तेल विपणन कंपन्यांनी म्हटलं आहे की, व्यावसायिक सिलेंडरच्या नवीन किंमती आजपासून म्हणजेच, २२ डिसेंबरपासून लागू झाल्या आहेत. म्हणजेच, आजपासून देशातील सर्व प्रमुख शहरांमध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत कमी झाली आहे. **। पान २ वर**

## मराठीचं 'रिंगाण' समृद्ध करणारी कामगिरी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




मुंबई : अस्सल ग्रामीण शैली हे मराठी भाषेचे वैभव आहे. या शैलीला भारतीय साहित्य विश्र्वात ओळख निर्माण करून देण्याची, भारतीय साहित्य विश्र्व समृद्ध करण्याची कामगिरी कादंबरीकार कृष्णात खोत यांनी केली आहे. त्यांच्या या शैलीवर आणि प्रतिभेवर साहित्य अकादमी पुरस्काराने शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांनी 'रिंगाण' मधून मराठी साहित्याचे रिंगण समृद्ध करणारी अभिमानास्पद कामगिरी केली **। पान २ वर**

## नागरिकांनो घाबरू नका, काळजी घ्या; कोरोना जेएन-वन व्हेरिएंटच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांकडून आरोग्य यंत्रणेचा आढावा

### राज्यभरातील आरोग्य संस्थांचे स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीक आणि फायर ऑडीट करावे

### राज्यात ६३ हजार विलगीकरण, ३३ हजार ऑक्सिजन बेड्स उपलब्ध

ठाणे : देशात आणि राज्यात सध्या जेएन-वन हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. यापार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आरोग्य यंत्रणा तसेच जिल्हाधिकारी यांची बैठक घेतली. राज्यभरातील आरोग्य संस्थांचे स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीक आणि फायर ऑडीट करण्यात यावे. त्याचबरोबर रुग्णालयांमध्ये विलगीकरण आणि ऑक्सिजन बेडस् यांची यंत्रणा सज्ज ठेवावी. नागरिकांनी घाबरून न जाता कोरोना प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करावे, राज्यभरातील यंत्रणा सज्ज असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.



मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून ही बैठक घेतली. त्यामध्ये आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर संबंधित विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.

ऑक्सिजन प्लांट्स, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन पाईपलाईन्स, आरटीपीसीआर लॅब, डयुरा/लिक्विड ऑक्सिजन प्लांट या सर्व बाबी सुस्थितीत आहेत का याची तपासणी करावी व योग्य पद्धतीने ते कार्यान्वित आहेत की नाही याची खात्री करतानाच लसीकरणाचा आढावा घ्यावा, ज्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांची माहिती घ्यावी व लसीकरण करण्याच्या दृष्टीने तयारी ठेवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

लस व औषध साठा पुरेसा उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी. आरोग्य यंत्रणेने टास्क फोर्सची स्थापना करुन त्यातील तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी कोविड सेंटर, विलगीकरण बेड्स, आयसीयू बेड्स, व्हेंटिलेटर बेड्स च्या सद्य:स्थितीबाबतचीही माहिती यावेळी घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशाने याआधी देखील कोविडच्या संकटाचा धीरोदात्तपणे यशस्वी मुकाबला केला आहे. संपूर्ण जगाने त्याबाबतीत आपल्या देशाचे अनुकरण केले. मागील अनुभवाच्या आधारे आताही राज्यातील यंत्रणा संपूर्णपणे सज्ज आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी. आगामी सण व नववर्षाचे स्वागत या पार्श्र्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्क् वापरावा. आपल्यामुळे इतरांना संसर्ग होणार यासाठी काळजी घेण्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नागरिकांना केले.

सोशल मीडियावरून तसेच प्रसारमाध्यमांनी देखील या नव्या व्हेरिएंट संदर्भात चुकीच्या बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घेणे जेणेकरून लोकांमध्ये संभ्रम वा घबराट निर्माण होणार नाही, अफवा पसरणार नाही. माहिती प्रसारीत करताना अधिकृत माहितीचाच उपयोग करावा, यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. शासन यंत्रणा एकजुटीने कोणत्याही परिस्थितीचा **। पान २ वर**

## पाणी पुरवठा विभागातील लिपिक समदुरले निलंबित,मात्र लेखाधिकारी श्रीकांत मिरगळे आणि सहायक लेखाधिकारी प्रकाश शेंडगे मोकाट

### जल जीवन मिशन टेंडर मध्ये मोठा घोटाळा

अक्कलकोट/प्रतिनिधी:जिल्हा परिषद सोलापूर पाणी पुरवठा विभागात मनमानी कारभार करून भ्रष्टाचार केल्याने तत्कालीन लिपिक समदुरले यांना निलंबित करण्यात आले.परंतु या भ्रष्टाचार कारभार मध्ये मुख्य सुत्रदार असलेले लेखाधिकारी श्रीकांत मिरगळे आणि सहायक लेखाधिकारी प्रकाश शेंडगे याना अद्यापही निलंबित केले नसल्याने या विभागात भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे.



गेल्या वर्षी अक्कलकोट तालुक्यातील कंट्टेहल्ली येथील पाणी पुरवठा कामात निविदेचा अतिरिक्त सुरक्ष ठेव रक्कमेचा धनाकर्ष मुदतीत भरणा केला नसल्याने निविदा अटी व शर्तींचा भंग केला आहे.मुदती नंतर धनाकर्ष नियमा नुसार भरून घेता येत नसतानाही भरून घेतला आहे. वास्तविक पाहता प्रकाश शेंडगे सहायक लेकाधिकरी आणि लेखाधिकारी श्रीकांत मिरगाळे यांनी तपासणी करून पवार या ठेकेदार विरुध्द कारवाई साठी फाईल वरिष्टाकडे पाठविण्याचे नियम असताना कायदा डावलून प्रसाद पवार या ठेकेदाराला वर्क ऑर्डर देण्यास भाग पाडले आहे. या मनमानी भ्रष्टचार कारभारा बाबत अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी कोहिणकर यांनी तात्काळ अवहाल सादर करण्या बाबत आदेश दिले होते.परंतु आठ महिने उलटून गेले असतानाही अद्यापही अहवाल सादर केले नाहीत. यामुळे येथे चक्क अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी कोहिणकर यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे.

> अक्कलकोट तालुक्यातील कंट्टेहल्ली येथील जल जीवन मिशन पाणी पुरवठा योजनाचा ई निविदा कामात कायदा डावलून चुकीच्या पद्धतीने दिलेला कार्यरंभ आदेश रद्द करण्या बाबत माझ्याकडे मे महिन्यात तक्रार अर्ज प्राप्त झाले होते.त्या अनुषगाने मी तात्काळ चौकशी करून अवहाल सादर करण्या बाबत आदेश दिले होते. मात्र आता गेल्या दीड दोन महिने पासून सदर योजना सी. ओ. मॅडम यांचेकडे आहे.
>
> **संदीप कोहिणकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि प.सोलापूर**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे बादोला जल जीवन मिशन पाणी पुरवठा ई निविदा मध्ये श्री हवा मल्लिनाथ कंट्रक्शन हे १७ ऑक्टोंबर २३ रोजी ई निविदा भरली होती. या ई निविदा मध्ये पेज क्रमांक सात ते सोळा दरम्यान बीड कॅपेसिटी आणि इन्कटॅक्स रिटन कॉफीचे प्रत जोडून ऑनलाईन अपलोड केले होते. बीड कॅपेसिटी आणि इन्कटॅक्स रिटन कॉफीचे प्रत ऑनलाईन मध्ये स्पस्टपणे दिसत असतानाही लेखाधिकारी श्रीकांत मिरगाळे व सहायक लेखाधिकारी प्रकाश शेंडगे हे तपासणी कामात हलगर्जीपणा करून पात्र ठेकेदाराला अपात्र केले आहे.

याशिवाय अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ ग्राम पंचायत कडून पाणी पुरवठा ठेकेदारांची अनामत रक्कम परत करावी म्हणून गेल्या दीड वर्षापूर्वी पत्र दिले असतानाही अद्यापही अनामत रक्कम परत केली नाही.

एकंदरीत पाणी पुरवठा कामात प्रकाश शेंडगे सहायक लेकाधिकरी आणि लेखाधिकारी श्रीकांत मिरगाळे यांनी दबावाला व अमिषाला बळी पडून आपल्या कर्तव्यात कसूर करून शासनाची चक्क फसवणूक करीत असल्याने या विभागात आंधळा दळतोय अन् कुत्रा पीठ खातोय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## आयुष्यमान भारत योजनेत देशात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असेल : डॉ.ओमप्रकाश शेटे

**✻ शासन निर्णय २८ जुलै २०२३ नुसार आयुष्यमान भारत योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना एकत्रित करण्यात आली, या अंतर्गत पाच लाखापर्यंतचे आरोग्य उपचार मोफत करण्यात येणार ✻ जिल्ह्यात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत गोल्डन कार्डचे लाभार्थी संख्या २३ लाख ४७ हजार ५५५, तर प्रत्यक्ष गोल्डन कार्ड काढलेल्या लाभार्थ्यांची संख्या ६ लाख ६८ हजार ३५५ ✻ सोलापूर जिल्हा परिषदेने एकाच दिवसात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ५० हजार लाभार्थ्यांची नोंदणी केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांचा सत्कार करण्यात आला ✻ या योजनेतील लाभार्थ्यांची नोंदणी संख्या वाढवण्यासाठी स्वस्त धान्य दुकाने, अक्कलकोट, पंढरपूर व सिद्धेश्र्वर मंदिराच्या दर्शन रांगेच्या सुरुवातीला नाव नोंदणी साठी डेस्क उभारणार**

सोलापूर/प्रतिनिधीः आयुष्यमान भारत योजना अंतर्गत राज्यातील एकही पात्र लाभार्थी आरोग्य उपचारापासून वंचित राहणार नाही यासाठी आरोग्य यंत्रणे बरोबरच सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने गोल्डन कार्ड नोंदणी व प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी अतिशय गतिमान पद्धतीने प्रक्रिया राबवावी. या योजनेच्या अंमलबजावणीत संपूर्ण देशभरात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर असेल असा विश्र्वास आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयुष्यमान भारत/महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पायाभूत सुविधा बाबत डॉ. शेटे यांनी आढावा घेतला, त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, आयुष्यमान भारत योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी, डॉ. दिलीप वाघमारे, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्र्वर सोळुंके यांच्यासह सर्व आरोग्य विभागाचे प्रमुख व जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. शेटे म्हणाले की, आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत संपूर्ण देशभरात जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांची नोंदणी करून त्यांना गोल्डन कार्ड वितरित करून देण्याबाबत मोहीम सुरू आहे.



महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांची नोंदणी करून त्यांना गोल्डन कार्ड देण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्यातील जवळपास ९० टक्के नागरिकांना या योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांचे आरोग्य उपचार मोफत केले जाणार आहेत. यासाठी राज्यभरात जवळपास एक हजार खाजगी रुग्णालय पॅनलवर आहेत व लवकरच आणखी ३५० रुग्णालयांना पॅनलवर घेण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णांना त्यांच्या जवळच्या रुग्णालयात आरोग्य उपचारांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात ५१ रुग्णालये पॅनलवर असून जिल्ह्यातील अकरा तालुक्यापैकी मोहोळ व अक्कलकोट तालुक्यात एकही रुग्णालय पॅनलवर नाही. आरोग्य यंत्रणेने या दोन्ही तालुक्यासह जिल्ह्यातील पॅनेल वरील रुग्णालयांची संख्या वाढवण्यासाठी तात्काळ प्रस्ताव पाठवावेत. तसेच प्रत्येक तालुक्यात किमान पॅनल वरील रुग्णालयांची संख्या दोन असली पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश डॉक्टर शेटे यांनी दिले. शासकीय योजनेअंतर्गत उपचार केल्यानंतर शासनाकडून खाजगी रुग्णालयाना पॅकेज दिले जाते ते कमी असल्याने उपचार करण्यात अडचणी येत असल्याचे दिसून येत आहे. तरी पॅकेज मध्ये वाढ करण्यासाठी एका समितीचे गठण करण्यात येणार असून पॅकेजच्या रकमेत वाढ प्रस्तावित असल्याने खाजगी रुग्णालयांनी पॅनलवर येण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत व गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या ४७ लाख ६१ हजार १७२ इतकी असून आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत एकूण लाभार्थी २३ लाख ४७ हजार ५५५ इतके आहेत तर आज रोजी पर्यंत सहा लाख ६८ हजार ३५५ लाभार्थ्यांना **। पान २ वर**

# संपादकीय

## महत्वाचा संदेश...

तिन्ही राज्यांचे मुख्यमंत्री निवडण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. छत्तीसगड, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री या आधीच जाहीर झाले होते, भाजपने राजस्थानचा मुख्यमंत्रीही जाहीर केला. राजस्थानात भाजपने भजनलाल शर्मा यांना मुख्यमंत्री करून सर्वांनाच चकित केले आहे. राजस्थानातील अनेक दिग्गज नेते या पदाच्या स्पर्धेत होते, ते सारे एका झटक्यात बाद ठरवण्यात आले आहेत. वसुंधराराजे यांनी आमदारांची जुळवाजुळव करून दबाव आणण्याचा प्रयत्न चालवला होता, परंतु तो साफ झुगारून देण्यात आला आहे. तिन्ही राज्यांमध्ये अनपेक्षित नेत्यांची निवड करून भाजप श्रेष्ठींनी पक्ष संघटनेवरील आपली पकड कमालीची मजबूत केली असून त्यांना आव्हान देण्याची ताकद आता भाजपमध्ये कोणामध्येच शिल्लक नाही आणि कोणी 'ब्र'ही काढू शकणार नाही, असा संदेश पसरवण्यात ते यशस्वी झाले आहेत. या तिन्ही राज्यांतील मुख्यमंत्रिपदावर ज्या नवख्या नेत्यांची निवड करण्यात आली आहे, त्यातून अनेक संदेश दिले गेले आहेत. यातील पहिला ठळक संदेश म्हणजे कोणत्याही राज्यांतील कोणाही प्रबळ नेत्याचे यापुढे काहीही चालणार नाही. दुसरा संदेश म्हणजे त्यांनी जातीची समीकरणे व्यवस्थित जुळवून सर्वच जातींना भाजप सामावून घेतो हा महत्त्वाचा व हिशेबी संदेश दिला आहे. त्यांनी छत्तीसगडमध्ये आदिवासी आमदाराला मुख्यमंत्री केले, मध्य प्रदेशात ओबीसी नेत्याच्या गळ्यातही माळ पडली आणि राजस्थानात ब्राह्मण समाजालाही संधी दिली गेली. ब्राह्मण समाज हा अगदी सुरुवातीपासून संघ-भाजपचा समर्थक समाज आहे. त्यामुळे सामाजिक समीकरण व्यवस्थित जुळवण्यात भाजपश्रेष्ठी यशस्वी झाल्याचा आणखी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. भाजप पक्ष संघटनेत वरिष्ठ पदांवर आता कोणालाही बसवण्याचा धाडसी निर्णय पक्षाचे वरिष्ठ कसलाही मुलाहिजा न बाळगता घेऊ शकतात हा तिसरा महत्त्वाचा संदेश यातून दिला गेला. तीन राज्यांत निवडण्यात आलेल्या या तिन्ही नेत्यांना संघ कार्याची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे संघटनेत कोणत्याही अपेक्षेशिवाय प्रामाणिक कार्य करणाऱ्यांनाच आता यापुढे वरिष्ठ पदावर संधी मिळेल, असा महत्त्वाचा असलेला संदेशही त्यांनी दृढ केला आहे.

## शाळा बाह्य... नेमक कोण...?

वरील शीर्षक वाचून कदाचित तुम्हला ही प्रश्न पडला असावा, चला तर ह्या वरील प्रश्नच उत्तर आपण शोधण्याचा प्रयत्न करू या.

ऑगस्ट २००४ मध्ये भारत सरकारने 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय'ही योजना सादर केली होती . त्यानंतर अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , इतर मागासवर्ग , अल्पसंख्याक समुदाय आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमात समाकलित करण्यात आली.

ग्रामीण भागात आणि वंचित समुदायांमध्ये लैंगिक असमानता अजूनही कायम आहे. नावनोंदणीचा कल पाहता, मुलांच्या तुलनेत प्राथमिक स्तरावर मुलींच्या नावनोंदणीमध्ये लक्षणीय अंतर आहे, विशेषत: उच्च प्राथमिक स्तरावर. प्राथमिक स्तरावर बोर्डिंग सुविधांसह निवासी शाळांची स्थापना करून समाजातील वंचित गटातील मुलींना दर्जेदार शिक्षण व्यवहार्य आणि सुलभ आहे याची खात्री करणे हे KGBV चे उद्दिष्ट होते.

ही योजना २००४ मध्ये सुरू झाल्यापासून शैक्षणिकदृष्ट्या मागास गटांमध्ये (एइझी) लागू होती जिथे ग्रामीण महिला साक्षरता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे (४६.१३%: जनगणना २००१) आणि साक्षरतेतील लैंगिक अंतर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे (२१.५९%: जनगणना २००१). या ब्लॉक्सपैकी, अशा भागात शाळा स्थापन केल्या जाऊ शकतात:

**१.**आदिवासी लोकसंख्येची एकाग्रता, कमी महिला साक्षरता आणि/किंवा अनेक मुली शाळाबाह्य

**२.**SC, ST, OBC आणि अल्पसंख्याक लोकसंख्येची एकाग्रता, कमी महिला साक्षरता आणि/किंवा अनेक मुली शाळाबाह्य.

**३.**कमी महिला साक्षरता असलेले क्षेत्र अनेक लहान, विखुरलेल्या वस्त्या असलेले क्षेत्र जे शाळेसाठी पात्र नाहीत पात्र ब्लॉक्सच्या निकषांमध्ये १ एप्रिल २००८ पासून पुढील गोष्टींचा समावेश करण्यासाठी सुधारणा करण्यात आली.

**४.**३०% पेक्षा कमी ग्रामीण महिला साक्षरता असलेले अतिरिक्त ३१६ शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले गट.

**५.**९४ शहरे/शहरांमध्ये अल्पसंख्याक एकाग्रता (अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने ओळखलेल्या यादीनुसार) महिला साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे (५३.६७%: जनगणना २००१). ही योजना २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू करण्यात आली.

आसाम , आंध्र प्रदेश , तेलंगणा , अरुणाचल प्रदेश , बिहार , छत्तीसगढ , दादरा आणि नगर हवेली , दिल्ली , गुजरात , हरियाणा , हिमाचल प्रदेश , जम्मू आणि काश्मीर , झारखंड , कर्नाटक , मध्य प्रदेश , महाराष्ट्र , मणिपूर , मेघालय , ओशाळ , ओलंड , मिशालँड , पंजाब , राजस्थान , तामिळनाडू , त्रिपुरा , उत्तर प्रदेश , उत्तराखंड आणि पश्रि्चम बंगाल .

२,५७८ घत्रह्नती भारत सरकारने मंजूर केले होते. यापैकी ४२७ केजीबीव्ही मुस्लिम एकाग्रता ब्लॉकमध्ये, ६१२ एसटी ब्लॉकमध्ये, ६८८ एससी ब्लॉकमध्ये मंजूर करण्यात आले आहेत. शैक्षणिक मागास गटांमध्ये एकूण ७५० निवासी शाळा उघडण्यात आल्या आहेत. ७५% नावनोंदणी डउ, डढ, जइउ आणि अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी आणि उर्वरित २५% दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींसाठी राखीव आहेत,

अश्या प्रकारे घत्रह्नत ची सुरवात करण्यात आली, त्याच बरोबर

'नवोदय विद्यालय 'च्या पश्र्वभूमीवर ह्या शाळेची निर्मिती केंद्रसरकारने केली, महाराष्ट्र मध्ये जवळ-जवळ ४३ घत्रह्नत निवासी शाळा आहेत, ह्या शाळेत अश्या मुलीनं घेतल जातं ज्या शाळेच्या प्रवाहत नाही अर्थात त्या 'शाळा बाह्य'आहेत, किंवा त्यांना पालक नाहीत अश्या मुलींना येथे प्रवेश दिला जातो, अक्षराची ओळख नसलेल्या मुलींना अनेक प्रयत्न करून घडवलं जातं आणि हे घडवण्याचं कार्य येथील शिक्षक करत असतात, अनेक संकटाना अहवान देत हे शिक्षक ह्या मुलींना शाळेच्या प्रवाहात आणतात, येथील लेखापाल असो स्वयंपाकी असो अथवा येथील शिपाई किंवा चौकीदार, आपले जीवाचे रान करून ह्यांचे सुरक्षा आणि रक्षण करत असतात आणि हे करत असताना जवळ जवळ शाळे साठी १६,१७ वर्ष हे अथांग झटत आहेत, ते पण अगदीच तुटपुनंज्या मानधन वर जे मानधन वाढत्या महागाईल सामना करू शकत नाही, त्यातच लेकराचं शिक्षण, दवाखाना, रूम भाडे, प्रवास खर्च,महिन्याचं राशन, अनेक कर्जाचे हप्ते इत्यादी अनेक समस्याना तोंड देत, सांगा कसा हा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी स्वतःच अस्तित्व टिकून राहिला असेल विचार करा. त्यात सरकार च जरासं ही लक्ष मात्र यांच्या कडे जातं नाहीत म्हणून आज ही ह्या लोकांना कंत्राटीपद्धतीवर राबवल जातं आहे, अनेकांचे आयुष्य खर्ची झालं, काहीचे सेवानिवृत्ती होण्याचं वय आलं, डोळ्यात तेल घालून सेवेत कायमस्वरूपी वाट पाहत असणाऱ्या ह्या कर्मचाऱ्यांच्या आयुष्याची माती होत आली आहे पण ह्या सरकारला जाग येत नाही, रोज स्वप्न उरात ठेवून कित्येक रात्र हा कर्मचारी असावं गालत आहे पण ह्या सरकार त्याची जरा ही पर्वा नाही. सर्वात मोठी लोकशाही असलेला हा आपला देश आणि त्याच देशातील पुरोगामी महाराष्ट्र आणि त्याच महाराष्ट्र मध्ये ही अवस्था..? अक्षरशः काही ना तर आता आपलाच जीव नकोस झाला आहे, इतकं वर्ष राबत आले आहेत पण ना धड मोल ना धड किंमत आशी अवस्था निर्माण झाली आहे.

प्रत्येका पुढे जगाव की मरावं हाच एक प्रश्न पडला आहे, मुलं मोठी आहेत, पण आजी ही त्यांचे वडील, आई त्यांना हवं तस शिक्षण, त्यांची स्वप्न पूर्ण करण्यास नाकाम झाला आहे, आणि ह्या सर्वांचा दोषी ह्या देशातील सरकार आहे, आता तरी सरकारने ह्या सर्व कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करून योग्य न्याय द्यावं इतकीची अपेक्षा आहे, हा शाळेतील कर्मचारी त्यांना जितकं शक्य होईल तितकं राबतात इतकं असून ही आज तो शाळेच्या बाहेरच असल्या सारखं झालं आहे, शाळेत मुली शाळा बाह्य सांगितले जाते पण खऱ्या अर्थाने हेच कर्मचारी शाळा बाह्य झाले आहेत असं आता वाटू लागलं आहे, वरील शीर्षकच उत्तर ही तुम्हला आता सापडलं असेलच नेमक कोण आहेत शाळे बाह्य...?

**-दिनेश उर्फ संघरत्न घनघाव.**
**मो.९०४९०७४१८४.**

पान १ वरुन

## आयुष्यमान भारत योजनेत देशात..

गोड कार्ड गोल्डन कार्ड देण्यात आलेले आहे तर १६ लाख ७९ हजार लाभार्थ्यांचे गोल्डन कार्ड पुढील काही दिवसात काढण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी आरोग्य यंत्रणेने तसेच जिल्हा प्रशासनाने शिबिरांचे आयोजन करावे. त्याप्रमाणेच अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर, पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच सोलापूर शहरातील सिद्धेश्र्वर मंदिर येथे येणाऱ्या भाविकांची नोंदणी करण्यासाठी दर्शन रांगेच्या सुरुवातीला नोंदणी काउंटर सुरू करण्याची सूचना ही डॉ. शेटे यांनी केली. सोलापूर महापालिका गोल्डन कार्डच्या नोंदणीत खूपच पाठीमागे असून महापालिकेने गोल्डन कार्ड ची संख्या वाढवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे असेही त्यांनी सुचित केले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात चांगले काम झाले पाहिजे. अंगणवाडी, शाळा येथील शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी नियमित झाली पाहिजे. ज्या बालकांना गंभीर आजार असतील व त्यांच्यावर शस्त्रक्रिया ची आवश्यकता असेल अशा बालकांना वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच या कार्यक्रमांतर्गत आरोग्य साहित्य तसेच अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध असल्याची माहिती डॉ. शेटे यांनी यावेळी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आयुष्यमान भारत योजना अंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांची नोंदणी करून घेण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी महा शिबिरांचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

प्रारंभी आयुष्यमान भारत योजनेचे जिल्हा समन्वयक डॉक्टर जोशी व डॉक्टर वाघमारे यांनी या योजनेअंतर्गत जिल्ह्यात केलेल्या कामाची माहिती सादर केली.

यावेळी सोलापूर जिल्हा परिषदेने जिल्ह्याच्या ग्रामीण भागात एकाच दिवसात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ५० हजार लाभार्थ्यांची नोंदणी करून अत्यंत उत्कृष्ट काम केल्याबद्दल समितीचे प्रमुख डॉक्टर ओमप्रकाश शेटे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## नागरिकांनो घाबरू नका, काळजी घ्या;

मुकाबला करण्यासाठी पूर्णत: सज्ज आहे. यंत्रसामुग्री, औषध साठा, इतर साधनसामुग्री मुबलक प्रमाणात उपलब्ध् आहे. त्यामुळे जनतेने घाबरु नये. काळजी घ्यावी काळजी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ, आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी आरोग्ययंत्रणेच्या सज्जतेबाबत माहिती दिली. आरोग्य यंत्रणेच्या सर्व यंत्रसामुग्री, इतर सर्व यंत्रणा योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याची खात्री करण्यासाठी दि. १५ ते १७ डिसेंबर २०२३ या कालावधीत ठिकठिकाणी मॉक ड्रिल घेतल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या राज्यात ६३ हजार विलगीकरण बेड्स, ३३ हजार ऑक्सिजन बेड्स, ९ हजार ५०० आयसीयू बेड्स व सहा हजार व्हेंटिलेटर बेड्स उपलब्ध आहेत. सध्या राज्यात कोरोनाचे ४५ रुग्ण (मुंबर२७, पुणे-८, ठाणे-८,कोल्हापूर-१ रायगड-१) आढळून आले आहेत, असे श्री. म्हैसकर यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी जेएन वन या नव्या व्हेरिएंटबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येईल, असे सांगितले.

## प्रत्येक सिलेंडरवर 'या' ग्राहकांना

यापूर्वी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती सातत्यानं वाढत होत्या. गेल्या ३ महिन्यांत त्यांच्या किमतींत तिनदा वाढ करण्यात आली होती आणि त्यादरम्यान सिलेंडरच्या किमती ३२० रुपयांवर पोहोचले होते. गेल्या वेळी, या महिन्याच्या पहिल्या दिवशी, १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरांत प्रत्येकी २१ रुपयांनी वाढ करण्यात आली होती. त्यापूर्वी नोव्हेंबर महिन्यात त्यांच्या किमती १०१ रुपयांनी आणि ऑक्टोबर महिन्यात २०९ रुपयांनी वाढल्या होत्या. आज किमतीतील बदलानंतर मुंबईत सर्वात स्वस्त एलपीजी सिलेंडर ग्राहकांसाठी उपलब्ध झाला आहे, तर चेन्नईच्या ग्राहकांना सर्वाधिक किंमत मोजावी लागणार आहे. चार महानगरांमध्ये एलपीजीच्या किमती मुंबईत सर्वात कमी आणि चेन्नईमध्ये सर्वाधिक आहेत. तर किमतींत घट झाल्यानंतर, मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत आजपासून १,७१० रुपयांवर आली आहे, तर चेन्नईमध्ये प्रभावी किंमत १,९२९ रुपयांपर्यंत खाली आली आहे. त्याचप्रमाणे, आता दिल्लीत किंमत १,७५७ रुपये आणि कोलकातामध्ये १,८६८.५० रुपये झाली आहे.

एकीकडे व्यावसायिक सिलेंडरच्या किमतींमध्ये सातत्यानं बदल पाहायला मिळत आहेत. तर तेल कंपन्यांनी १४ किलोग्रॅम वजनाच्या घरगुती सिलेंडच्या किमतींमध्ये कोणताही बदल केलेला नाही. IOCL च्या अधिकृत वेबसाईटवर नमूद करण्यात आल्यानुसार, दिल्लीत घरगुती सिलेंडर ९.३ रुपयांना, कोलकात्यात ९२९ रुपयांना, मुंबईत ९०२.५० रुपयांना आणि चेन्नईत ९१८.५० रुपयांना उपलब्ध आहे.

## मराठीचं 'रिंगाण' समृद्ध करणारी

आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कादंबरीकार कृष्णात खोत यांचे साहित्य अकादमीचा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

'आधुनिक जगरहाटीत ग्रामीण संस्कृती आणि आपल्या गावा- गावातील बदलत्या जीवनाचं नेमकं चित्रण करण्यात श्री. खोत यांचा हातखंडा आहे. तो त्यांनी आपल्या लेखनातून अनेकदा सिद्ध केला आहे.

त्यांच्या अनेक कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. त्यांच्या साहित्यकृतीचा सन्मान होण्याने मराठी साहित्य क्षेत्रातील नवोदितांसाठी प्रेरणा मिळणार आहे.लेखक, कादंबरीकर कृष्णात खोत यांच्या हातून यापुढेही अशीच दर्जेदार साहित्य सेवा घडत राहील, असा विश्र्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## बेवारस मयताबद्दल पोलिसांचे आवाहन

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे हद्दीतील वागदरी दूरक्षेत्रातील वागदरी ते आळंद जाणारे रोडवरील नंदकुमार कस्तुरचंद आागरखेड



वय ५५ वर्ष राहणार वागदरी तालुका अक्कलकोट यांचे शेतातील विहिरीमध्ये एक अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयाचा पुरुष जातीचा इसम हा अज्ञात कारणावरून नंदकुमार आगरखेड यांचे विहिरीत फोडून बुडून मयत झाला आहे म्हणून वगैरे मजकूरच्या खबरीवरून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे अ. म. न. नंबर ७४/ २०२३ फौजदारी प्रक्रिया सहित कलम १७४ प्रमाणे दिनांक ९ १२/ २३ रोजी दाखल आहे

मृत देहाचे वर्णन : शरीर माध्यम,उंची पाच फूट सात इंच, डोके जलचर प्राण्याने कुडतडलेल, चेहरा जलचर प्राण्याने कुडतडलेल, छाती शाबूत जलजल प्राण्याने कुडतडलेल, पोशाख बदामी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा पॅन्ट, हात दोन्ही हाताची कातडी जलचर प्राण्याने कुडतडलेल, पाय दोन्ही पाय शाबूत असून दोन्ही पायाची कातडी जलचर प्राण्याने कुडतडलेल, तरी वरीलवर्णनाच्या अनोळखी मृत इसमाचे नाव पत्ता बाबत माहिती मिळाल्यास उत्तर पोलीस ठाणे अक्कलकोट येथे संपर्क साधावा ०२१८१२२०२४५ तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण ८३०८२४५९१० यावर संपर्क साधावा असे पोलीस आवाहन केले आहे

## तपोरत्नं पुण्यस्मरण; नेताजी शिक्षण संकुलात भावभक्ती गीतांचा कार्यक्रम

सोलापूर/प्रतिनिधीः श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य लिं. श्री ष. ब्र. तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने मराठी-हिंदी भावभक्तीगीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.




यावेळी स्वरभारतीच्या कलाकारांनी ओंकार स्वरूपा ,विठू माऊली तू ,शोधीशी मानवा जग मे सुंदर है , वीरतपस्वी चन्नवीर , मन लागो रे, दर्शन द्या ओ, अरे माणसा तू, लिंगाष्टक, विठ्ठल- विठ्ठल, आली आली हो, चढता सुरज, देवा योगिया, घोंगडीवाला गवळण आदी विविध गीत सादर करून प्रेक्षकांचे मने जिंकली. स्वरभारतीचे संचालक प्रवीण कुंभार, निवेदक प्रा.हनुमंत मते, तबलावादक ऋतुराज सोनवणे, मृदंग वादक लिंबाजी सुतार, पॅड वादक परमेश्र्वर इक्कळकी यांच्या मार्गदर्शनाखाली ललिता रॅका, वैष्णवी घंटे,प्रतिभा पाटील,रक्षता सुंकनपल्ली, लहरिका गोने, लावण्या मिसलोलु, कावेरी पगडचाल, धानेश्र्वरी अचलेरे, साक्षी कुरापाटी,आलेक्या विलासागर,हेमा झुंजा,समृद्धी दिंडोरे,दीक्षा चाटला,सृष्टी तोरुणगी या बालकलाकारांनी विविध गीत सादर केले. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते या सर्व कलाकारांचे सत्कार करण्यात आला.

## उत्तम प्रशासन मानवाधिकाराचे कवच : डॉ.ज्ञानेश्वर मुळे

पुणे : मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि प्रचारासाठी उत्तम प्रशासन आवश्यक असून ते एकप्रकारे मानवाधिकाराचे कवच आहे. सामान्य नागरिकांना न्याय देताना लोकसेवकांकडून नागरिकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ.ज्ञानेश्र्वर मुळे यांनी केले.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे प्राप्त झालेल्या मानावाधिकारांच्या उल्लंघनांच्या तक्रारींवर सुनावणी दरम्यान विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दूरदृष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करतांना डॉ.ज्ञानेश्र्वर मुळे बोलत होते. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, विभागीय उपआयुक्त रामचंद्र शिंदे, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, पिंपरी चिंचवडचे अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक अंकित गोयल, पश्रि्चम क्षेत्र तुरुंग पोलीस उपमहानिरिक्षक स्वाती साठे, येरवडा मध्यवर्ती तुरुंग अधीक्षक सुनिल भामल, कोल्हापूर मध्यवर्ती तुरुंग अधीक्षक भारत भोसले, गुन्हे अन्वेषण विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्रीकांत कोल्हापूरे, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त आदित्या तलवार यावेळी उपस्थित होते.

मुळे म्हणाले, मानवाधिकाराबाबत जनजागृतीसाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपाय योजना कराव्यात. त्यामध्ये नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात यावा. राष्ट्रीय तसेच राज्य मानावाधिकार आयोगातर्फे याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. मानवाधिकार आयोगातर्फे मानावाधिकारासंबधी पोलीसांना नियमित प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मानवाधिकारासंबधी मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आल्या असून त्याची अंमलबजावणी प्रशासनाने करण्याचे निर्देश डॉ.मुळे यांनी यावेळी दिले. जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी मानवाधिकाराच्या




संरक्षणासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. विशेष मोहिम राबवून मानवी नालेसफाई पूर्णपणे बंद करणे, वेठबिगारीला आळा घालणे, तसेच तृतीय पंथीयांची मतदार यादीमध्ये नोंदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दूरदृष्यप्रणालीद्वारे सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सिंधुदूर्ग आणि अहमदनगर जिल्ह्यातील मानवाधिकार उल्लंघनाच्या प्रकरणांचा आढावा आयोगाने घेतला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग शहरात चालू आसलेल्या ७ कोटी ५० लाख रुपयांच्या कामाची चौकाशी होई पर्यंत बिल देऊ नये

## अशोक जगदाळे यांच्या सह इतरांची नगरविकास मंत्र्यासह इतर अधिकाऱ्याना निवेदनाद्वारे साकडे

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहरात नगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या विविध विकास कामांची चौकशी होईपर्यंत त्या कामांचे बील काढण्यात येऊ नये अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे यांच्यासह शहरांतील नागरीकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग शहरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा पुरविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना व वैशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत शहरात सिमेंट रस्ते, गटार बांधकाम, तालिम बांधकाम, संरक्षण भिंत बांधकाम, उद्यान विकसित करणे, व्यायामशाळा, ओपन स्पेस खुली जागा विकसित करणे असे एकुण ३२ कामांकरीता ७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी शासनाने मंजुर केला होता. या निधितुन कामे करण्यात येत आहेत. सदरील कामे निकृष्ठ दर्जाची करून ठेकेदारांनी शासनाची व नागरीकांची फसवणुक केली असुन त्यामुळे झालेल्या कामांची चौकशी करण्यात यावी. त्याचबरोबर चौकशी पुर्ण होईपर्यंत कामाचे बील अदा करण्यात येऊ नये. शहरात करण्यात आलेल्या विविध कामाचे अंदाजपत्रक हे कामापेक्षा जास्त रकमेचे विशिष्ट लाभ मिळविण्याकरीता ३० ते ४० टक्के रक्कम वाढवुन बनविण्यात आले आहे. यामुळे शासनाच्या निधीचा जास्तीचा वापर होऊन नुकसान झाले आहे. शहरात करण्यात आलेले सिमेंट रस्ते हे निकृष्ट दर्जाचे व अंदाजपत्रकात दर्शविल्याप्रमाणे साहित्य न वापरता हलक्या दर्जाचे वापरण्यात आले आहे. गटार बांधकामात अनेक ठिकाणी स्टीलचा वापर करण्यात आले नाही. त्याचबरोबर रस्त्याची जाडी, लांबी व रुंदी योग्य प्रमाणात ठेवण्यात आली नाही. सदरील कामे केली जात असताना नगरपालिकेचा अभियंता कांही कामांचा अपवाद वगळता इतर कामांवर जातीने हजर राहिला नाही. शहरातील सर्व ३२ कामे उमरगा



येथील ठेकेदाराने घेतले होते परंतु प्रत्येक्षात काम करणारे ठेकेदार वेगळेच दिसुन येत आहेत. अनेक ठिकाणी कामांची विभागणी करून पोट गुत्तेदारास काम दिले गेले आहे. यामुळे कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेचा अपवेय झाला आहे. त्यामुळे शहरात करण्यात येत असलेल्या ३२ कामांपैकी ६ कामे अद्याप सुरू झालेली नाहीत.२६ कामांचे कॉलिटी कंट्रोल प्रमाणपत्रे हे सदरील संस्थेने कामांची पाहणी न करता जागेवर बसुन दिले आहेत. या बोगस प्रमाणपत्रांची चौकशी करण्यात यावी. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करता तसेच शासनाचे नुकसान टाळण्यासाठी सदरील कामांची त्रयस्तामार्फत चौकशी होणे गरजेचे आहे. ही चौकशी होईपर्यंत आज तारखेपासुन बिले काढण्यास मनाई करण्याचे आदेश व्हावेत. तसेच जे अधिकारी याकडे डोळे झाक करून बील काढतील ते बील त्यांच्याकडुन वसुल करण्यात यावे अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे, माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी नगरसेवक अमृत पुदाले,शिवनेरी तरुण मंडळाचे अध्यक्ष शिवाजी धुमाळ, माजी नगरसेवक महालिंग स्वामी, विकास सोसायटीचे चेअरमन संजय बेडगे, व्हाईस चेअरमन ताजोद्दीन सावकार, राजकुमार खद्दे शिवसेना (ठाकरे गट) शहर प्रमुख संतोष पुदाले,तालुका उप प्रमुख सरदारसिंग ठाकुर, माजी नगरसेवक शरीफ शेख, शब्बीर कुरेशी, अफसर जमादार व संजय दुबे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनाच्या प्रती नगरविकास मंत्री महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त संभाजीनगर व मुख्याधिकारी नगर परिषद नळदुर्ग यांनाही देण्यात आले आहे.

# राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनाने कामगार सेनेचे आंदोलन मागे

सोलापूर/प्रतिनिधीः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील शहरालगत असलेला श्री महालक्ष्मी मंदिर चौकात वाढते अपघात रोखण्यासाठी करण्यात आलेल्या आमरण उपोषण आंदोलन राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांच्या लेखी आश्र्वासनाने तूर्तास स्थगित केल्याचे कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष व उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख विष्णू कारमपुरी (महाराज) यांनी



प्रसिद्धी पत्रकाद्वारे व इलेक्ट्रिक मेडिया मुलाखती द्वारे दिली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने गुरुवारी दिनांक २१ डिसेंबर रोजी श्री महालक्ष्मी मंदिर चौक येथे सकाळी साडेअकरा वाजता कामगार नेते विष्णू कारमपुरी (महाराज) यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली या उपोषणात उपशहर प्रमुख शिवा ढोकळे, शहर उत्तर संघटक जर्गीस मुल्ला, रेवन बुक्कानुरे शिवा ढोकळे, कामगार सेनेचे सहसेक्रेटरी विठ्ठल कुऱ्हाडकर, युवती सेनेच्या शहराध्यक्ष रेखा आडकी, लक्ष्मीबाई ईप्पा यांच्या प्रमुख उपस्थितीती होती.

यावेळी आंदोलकांनी रस्ता मुक्त झालाच पाहिजे, कोण म्हणतं करणार नाही केल्याशिवाय सोडणार नाही, शिवसेना उद्धव ठाकरे जिंदाबाद, शिवसेना जिंदाबाद , कामगार सेना जिंदाबाद, शिंदे सरकार हाय हाय, खोके सरकार हाय हाय अशा घोषणा दिल्या.सदर प्रसंगी राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाचे अधिकारी श्री पांडे साहेब व श्री येमूल साहेब यांनी उपोषण स्थळी येऊन लवकरात लवकर म्हणजे तात्काळ अपघातीमुक्त चौक करण्याचे लेखी पत्र दिले आणि तात्पुरते वाहनांचे गती कमी करण्याचे छोटे गतिरोधक बसवीत आहोत आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून सिग्नल बसविण्यात येईल असे पत्र दिले त्या आधारे कारमपुरी (महाराज) यांनी कामगार सेनेच्या सुरू असलेल्या आंदोलन तात्पुरते मागे घेत असल्याची घोषणा केली.

सदर आंदोलनात गुरुनाथ कोळी, बिपिन साबळे, गोवर्धन चिलवेरी, श्रीनिवास बोगा, प्रशांत जक्का, पंडित पाटील, व्यंकटेश गुजर, बसवराज मडीवाळ, गोविंदराज कनकी, उमेश गोणे, सुदर्शन लोमटे, इम्रान शेख, सलीम शेख, अक्षय चिलवेरी, शुभम कारमपुरी, राधिका इप्पा, निर्मला दासी, स्वरूपा मादास, पद्मा दासी, निर्मला बिरु, लक्ष्मीबाई इप्पा,अक्षय चिलवेरी, पप्पू शेख, शरणप्पा जगले, रमेश चिलवेरी, अजय कारमपुरी, आप्पा चिलवेरी, यांच्यासह विडी कामगार, यंत्रमाग कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वागदरीत यशवंत यादव यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सत्कार

वागदरी/एस.के.गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथील शांत संयमी व एक दिलदार व्यक्ती महत्त्व असलेले यशवंत पांडुरंग यादव हे केंद्र सरकारच्या डाक विभागातून पोष्टमन म्हणून सेवा निव्रत्त झाल्या बद्दल वागदरी येथील ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



यशवंत यादव यांनी नळदुर्ग येथील पोस्ट ऑफिस अंतर्गत तब्बल ४४ वर्षे वागदरीचे पोस्टमन म्हणून अत्यंत प्रामाणिक पणे निष्कंलक सेवा केली. त्यांच्यामुळे वागदरी गावात स्वतंत्र पोस्ट ऑफिस निर्माण झाले. पोस्ट ऑफिस मार्फत केंद्र सरकारच्या अनेक योजनेचा लाभ येथील ग्रामस्थाना त्यांनी मिळवून दिला. सोशल मीडियाची सुविधा निर्माण होण्या आगोदर सायंकाळी पाच सहा वाजण्या दरम्यान पोस्टमन यशवंत यादव गावात गल्लोगल्ली हातात पत्रांचा गठ्ठा घेऊन फिरायलागले की प्रत्येकजन विचारत असत की आमचे पत्र आले का ? आमची मनीआर्डर आली का ?प्रत्येकाशी संयमाने उत्तर देत त्यांनी जनतेची सेवा केली.पोस्टात शेकडो ग्राहकांच्या आर्डी एफडी सारखे बचत खाते काढून लोकांना बचतीची सवय लावली.वेळेत सेवा देवून पोस्ट खात्याची विश्र्वासार्हता गावात निर्माण केली. तब्बल ४४ वर्षे पोस्ट खात्यात सेवाकरुन ते नुकतेच दी.१८ डिसेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने वागदरी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करून पुढील जीवनकार्यास त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी ह.भ.प.सुरेशसिंग परिहार, प्रवचनकार ह.भ.प.राजकुमार पाटील, जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरूजी,महादेव बिरादार, ज्ञानेश्र्वर पाटील, मदन पाटील, भालचंद्र यादव, दत्ता सुरवसे,बालाजी बिराजदार, किशोर सुरवसे,चंद्रकांत वाघमारे,बाळू पवार, शिवाजी माडजे,रामसिंग परिहार, जितेंद्र पाटील सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# २६ डिसेंबरपासून मुंबईत सुरू होणाऱ्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाला नक्की भेट द्या : गिरीश महाजन

मुंबई : उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंर्तगत महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री २६ डिसेंबरपासून मुंबई, वांद्रे येथील एमएमआरडीए मैदानावर सुरू होत आहे. हा भव्य कार्यक्रम दोन आठवड्यांच्या कालावधीत असून ८ जानेवारी रोजी या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे तरी महालक्ष्मी सरस प्रदर्शनाला सर्वांनी नक्की भेट द्या असे आवाहन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

मंत्री श्री.महाजन म्हणाले, दरवर्षी लक्षणीय आर्थिक उलाढाल करणाऱ्या बचत गटांना सक्षम बनवण्यात महालक्ष्मी सरस प्रदर्शन महत्त्वाची भूमिका बजावते. गेल्या दीड दशकात सुमारे ८ हजार ००० बचत गटांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून सहभाग घेतला आहे. महिला बचत गटांना त्यांनी तयार केलेली उत्पादने विक्री करणे तसेच शहरी बाजारपेठ अनुभवण्याची संधी मिळते,या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचा परिचय शहरातील नागरिकांना होत असतो.

या प्रदर्शनात भरतकाम केलेल्या साड्या, ज्यूटच्या वस्तू, बांबूच्या वस्तू, लाकडी वस्तू, चामड्याच्या वस्तू, कृत्रिम दागिने, लेडीज बॅग, बूट,ड्रेस मटेरियल, साड्या, चादरी, कार्पेट आणि पडदे यांचा समावेश आहे. . या वस्तू केवळ वैशिष्ट्यपूर्णच नाहीत तर उच्च दर्जाच्याही



आहेत, ग्रामीण कारागिरांचे कौशल्य आणि कारागिरीचे प्रदर्शन करतात. शिवाय, घरगुती मसाले, पापड, कुरडई आणि इतर खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल असतील. हे स्टॉल अभ्यागतांना अस्सल ग्रामीण स्वादिष्ट पदार्थ चाखण्याची आणि खरेदी करण्याची संधी देतील. मुंबईकर आणि संपूर्ण देशाने प्रिय असलेल्या ग्रामीण भारतातील खाद्यसंस्कृती आणि नावीन्यपूर्ण उपक्रम साजरे करणे हा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. महालक्ष्मी सरस प्रदर्शन हा चुकवू नये असा कार्यक्रम आहे असेही मंत्री श्री.महाजन म्हणाले.

या प्रदर्शनात, ग्रामीण महिलांनी बनवलेल्या विविध प्रकारच्या हस्तकलेच्या वस्तू उपलब्ध होतील. ग्रामीण भागातील स्वादिष्ट खाद्यपदार्थ,जळगावच्या भरीत ते कोकणातील मच्छी आणि तांदळाच्या भाकरीपर्यंत पर्यटकांना ग्रामीण भागातील चव चाखण्याची संधी मिळणार आहे. कोल्हापुरातील तांबडा-पंढरा रस्सा आणि सोलापूरची शेंगाची चटणी यांसारखे पारंपरिक पदार्थही उपलब्ध असतील. याशिवाय राज्याच्या विविध भागातील मसाले आणि हातसाडी येथील तांदूळ प्रदर्शनात असतील. ग्रामीण महिलांच्या कलागुणांना व कौशल्याला वाव या प्रदर्शनातून मिळणार आहे. मागील प्रदर्शनप्रमाणे यावेळी देखील नागरीकांनी प्रदर्शनास भेट देऊन जास्तीत जास्त खरेदी करावी व ग्रामीण भागातून दर्जेदार उत्पादन घेऊन आलेल्या महिलांचा उत्साह वाढवावा,असे आवाहन मंत्री श्री.महाजन यांनी केले आहे.

# ऊसतोड कामगारंच्या सोबत मुलांच्या वाढदिवस साजरा करून कामगारांना दिले गोड जेवण

## जय हिंद साखर कारखाना आचेगाव एग्री ओर्शेयर मंत्राजात तोरणगीचे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील तडवळ गटाचे एग्री ओर्शेयर मंत्राजत तोरणगी यांनी स्वतःच्या मुलाचा ८ वाढदिवस ऊसतोड कामगारांच्या सोबत चालू उसाच्या फडात साजरा करून सर्व कामगारांना गोड जेवण देऊन माणुसकीची दर्शन घडविले आहे.



सध्याचा धावफळीच्या जीवनात स्वतःचे आई वडील,भाऊ बहिण या नात्याचे लोकांना पाहायला,भेटायला आणि बोलायला वेळ नसल्याचे अनेक लोकांना आपण पाहतो.परंतु जयहिंद साखर कारखान्यात मागील अनेक वर्षापासून तडवळ गटाचे एग्री ओरशेयर म्हणून कार्यरत असलेले मंत्रजात तोरणगी या अधिकाऱ्याने स्वतःचे मुलाचे वाढदिवस ऊसतोड कामगाांच्या सोबत उसाच्या फडात साजरा करून सर्व कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना गोड बालुशा जेवण देऊन ऊसतोड कामगारांच्या प्रती माणुसकीच्या दर्शन घडविले आहे. या अनोख्या वाढदिवस उपक्रमाला जय हिंद कारखान्याचे चेअरमन गणेश माने देशमुख,बाब्रुवान काका माने देशमुख,कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.पी.देशमुख ,शेती अधिकारी जेऊरे साहेब, एग्री ओरशेयर श्रीशैल रब्बा समवेत कारखान्याचे सहकारी शुभेच्छा देऊन उपक्रमाचे स्वागत केले आहे.

# शरद जोशी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्षपदी शरणप्पा बमदे

अक्कलकोट/प्रतिनिधी :शरद जोशी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्षपदी शरणप्पा बमदे(गौडगांव ता.अक्कलकोट)याची निवड करण्यात आल्याची घोषणा स्व.भा.प.चे राष्ट्रीय अध्यक्ष, अनिल घनवट यांनी केली.यावेळी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतने नियुक्त पत्र देऊन सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.



शरद जोशी शेतकरी संघटनेचे सोलापूर जिल्हा दौरा दिनांक २०डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते.सोलापूर येथील संघटनेच्या कार्यालयाच्या सभागृहात बैठक पार पडली.या बैठकीत शेतकऱ्यांच्या समस्या,आंदोलनाची दिशा व पक्ष बांधनीवर चर्चा करण्यात आली.स्व.भा.प .चे राष्ट्रीय अध्यक्ष, अनिल घनवट, प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमाताई नरोडे, शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष हरिदास थिटे मामा व महादेव काशिद शोभा ताई गवळी महावीर काटकर महेश्र्वर गव्हाणे गुमते व बसवराज कुंभार आदी उपस्थित होते. या बैठकीत सोलापूर जिल्हा स्व भा प जिल्हाध्यक्षपदी महेश अभिमान हरणे यांची तर शेतकरी संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी शरणप्पा शिवपुत्र बमदे यांची निवड करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची पंढरपूर कार्यकारणी जाहीर

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईच्या पंढरपूर शहर व तालुका पदाधिकार्यांच्या निवडी जाहीर झाल्या असून पंढरपूर शहराध्यक्षपदी विनोद पोतदार तर तालुकाध्यक्षपदी रामदास नागटिळक यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पंढरपूरची वार्षिक सर्वसाधारण बैठक संघाचे पश्र्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व संघाचे मार्गदर्शक राधेश बादले पाटील, शंकर कदम, राजकुमार घाडगे, विवेक बेणारे, डॉ.राजेश फडे, ड.अरविंद जाधव,नागेश आदापूरे, मनोज पवार, तानाजी जाधव, गौतम जाधव यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली. यावेळी मागील वर्षाचे अहवाल वाचन करण्यात आले.तसेच संघाच्या उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी पंढरपूर शहर कार्यकारणीमध्ये शहर उपाध्यक्ष धनंजय राक्षे, कार्याध्यक्ष सुरेश गायकवाड, सचिव कुमार कोरे, खजिनदार संजय यादव, प्रसिध्दी प्रमुख दादासाहेब कदम, शहर समन्वयक मारूती वाघमोडे, शहर संघटक नेताजी वाघमारे, सदस्य विक्रम कदम, आशा क्षिरसागर यांच्या निवडी करण्यात आल्या तर तालुका कार्यकारणीमध्ये उपाध्यक्ष विजय नलवडे, कार्याध्यक्ष संतोष मोरे, सचिव संजय ननवरे, खजिनदार संजय रणदिवे, तालुका संघटक रवी कोळी, तालुका समन्वयक रोहन नरसाळे, सदस्यपदी लक्ष्मण शिंदे, नितीन खाडे, ऋषीकेश वाघमारे, सुनिल कोरके, राजेंद्र करपे, अभंगराव यांच्या निवडी



करण्यात आल्या आहेत. या बैठकीसाठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तर यावेळी नुतन व मावळते पदाधिकार्यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला.

# अन्नछत्र हे न्यास धार्मिक क्षेत्रात आदर्श : दिव्या कदम



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र हे न्यास धार्मिक क्षेत्रात आदर्श कार्य करत असल्याचे मनोगत भारती विद्यापीठ पुणेचे सदस्य दिव्या कदम यांनी व्यक्त केल्या.

त्या श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता मंडळाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी मंडळाचे सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सतिश महिंद्रकर, नामा भोसले, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगणुर, शिवराज स्वामी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडून राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनस्थळाची पाहणी

पुणे : शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनस्थळाची पाहणी करुन पूर्वतयारीचा आढावा घेतला. महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडविणारे उपक्रम प्रदर्शनस्थळी आयोजित करावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक अमोल येडगे, सहसंचालक रमाकांत काठमोरे, उपसंचालक डॉ.कमलादेवी आवटे, डॉ. नेहा बेलसरे आदी उपस्थित होते.

श्री. केसरकर म्हणाले, महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता ही सर्वांच्या उत्सुकतेचा आणि आकर्षणाचा विषय आहे. त्यामुळे राज्याच्या संस्कृतीचे दर्शन या प्रदर्शातून घडले पाहिजे. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रीडा संकुलाचा परिसरही दाखविण्यात यावा. राज्याच्या विविध भागातील खाद्यसंस्कृतीची ओळख करुन देणारी भोजन व्यवस्थाही करण्यात यावी, असे श्री. केसरकर म्हणाले.



राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्यामार्फत चक्राकार पद्धतीने मुलांसाठी राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार ५० व्या प्रदर्शनाचे यजमानपद महाराष्ट्राला मिळाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने २६ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत वैज्ञानिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय वयातच विज्ञान विषयाची गोडी लागावी व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, या हेतूने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. वय वर्षे १४ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना आपली सृजनशीलता दाखवण्यासाठी बाल वैज्ञानिक प्रदर्शनीच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या प्रदर्शनामध्ये राज्यशासन, केंद्रीय विद्यालय संघटन, नवोदय विद्यालय, टोमिक एनर्जी केंद्रीय विद्यालय, तिबेटीयन विद्यालय, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संलग्न शाळा आदी विविध व्यवस्थापनाच्या शाळा सहभागी होणार आहे. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामधून राष्ट्रीय स्तरावर पात्र झालेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून शालेय विद्यार्थी राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनाला भेट देणार आहे.या प्रदर्शनात २२५ दालनाची उभारणी केली जाणार केली आहे. विज्ञानविषयक उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यातील शासकीय व अशासकीय संस्थांचे दालन, महाराष्ट्राची संस्कृती, पारंपरिक खेळणी आदी विषयांचे नाविन्यपूर्ण दालन या बालवैज्ञानिक प्रदर्शनाचे वैशिष्ट्य राहणार आहे. विविध सांस्कृतिक कलागुणाचे सादरीकरण, विविध मार्गदर्शनपर व्याख्यानांचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री. येडगे यांनी दिली आहे.

# खानापूर व तडवळ पंचक्रोशीत अयोध्या मंगल कलशाचे झाले जोरदार स्वागत



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील मौजे खानापूर येथे आज अयोध्या येथून आलेल्या श्री प्रभू रामचंद्र प्राण प्रतिष्ठा अक्षता अभियान प्रसंगी अक्षता कळसाची सवाद्य मिरवणुक काढून जंगी स्वागत करण्यात आले. येत्या काही दिवसात प्रत्येक हिंदूच्या घरी अक्षता येणार आहे ,हीच आपल्यासाठी सौभाग्याचे दिवस आहे. दिनांक २२ जानेवारी ला अयोध्या येथे प्रभू श्रीरामचंद्राचे प्राण प्रतिष्ठापण होणार असून या मंगल पर्वा चा उत्सव आपल्याला प्रत्येक घरी दिवाळी प्रमाणे साजरी करू असेही आवाहन या प्रसंगी करण्यात आले.खानापूर येथे अयोध्या येथुन आलेल्या श्री प्रभू रामचंद्र प्राण प्रतिष्ठान अक्षता अभियान प्रसंगी अक्षता कळसा चे जंगी स्वागत करण्यात आले.

अक्कलकोट तालुक्यातील गुड्डेवाडी येथे अयोध्या येथून आलेल श्री प्रभू रामचंद्र प्राण प्रतिष्ठा अक्षता अभियान प्रसंगी अक्षता कळस सवाद्य मिरवणुकीने जंगी स्वागत करण्यात आले. तडवल भागातील अंकलगी येथे ही मंगल कलशाचे जोरदार स्वागत करण्यात आले आणि मिरवणुक काढण्यात आली. या कलाशाचे आगमन श्री नंदी बसवेश्र्वर देवस्थान अंकलगे येथे झाल्यावर दर्शनासाठी ग्रामस्थानी गर्दी केली आणि सर्वांनी दर्शन घेतले.

आज मौजे खानापूर येथे तसेच तडवळ भागाततील अनेक गावामध्ये अयोध्या येथून आलेल्या श्री प्रभू रामचंद्र प्राण प्रतिष्ठा अक्षता अभियान प्रसंगी अक्षता कळसाची

सवाद्य मिरवणुकाही काढण्यात आल्या आणि जागोजागी या मंगल कलशाचे जागोजागी उत्साहात स्वागत करण्यात आले या प्रसंगी मौजे खानापूर तसेच अंकलगी तडवळ पंचक्रोशीत ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ डी.फार्मसीची साईवेद फार्मा प्रा.लि.कंपनीला औद्योगिक भेट

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी (डिप्लोमा) मधील विद्यार्थ्यांनी जेजुरी (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीत असलेल्या साईवेद फार्मा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला नुकतीच भेट दिली.




स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या औद्योगिक व शैक्षणिक भेटीमधून विद्यार्थ्यांना फार्मसी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीतील कामकाज कसे असते याबद्धल माहिती व्हावी या हेतूने या औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. या भेटीमधून फार्मसीच्या विद्यार्थ्याना विविध औद्योगिक केंद्रांना लागणारे औषध क्षेत्रातील साहित्य, औद्योगिक क्षेत्रातील कच्चामाल आणि पक्का माल, ट्रान्सपोर्ट व विक्री, किरकोळ विक्री आदीबाबत माहिती मिळाली. तसेच कंपनीच्या विविध विभागांच्या प्रमुखांनी रॉ मटेरियल, प्रोडक्शन, कॉलिटी कंट्रोल, क्वालिटी एन्शुरन्स आणि पॅकेजिंग यासंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये औद्योगिक भेटी हा शैक्षणिक अभ्यासक्रमाचाच एक भाग आहे. अशा शैक्षणिक भेटी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित संकल्पनेच्या व्यावहारिक दृष्टिकोनासह वास्तविक कामकाज व औद्योगिक वातावरणाचा मोठा परिचय देतात. या व्यतिरिक्त औद्योगिक भेटी, सैद्धांतिक शिक्षण व व्यावहारिक एक्सपोजर मधील वाढणारी दरी कमी करतात. वर्गातील शिक्षणाच्या पलीकडे जाण्याच्या हेतूने औद्योगिक भेटी विद्यार्थ्यांना बाजारातील सध्याची गरज, उद्योगाची भविष्यातील परिस्थिती आणि उद्योगात लागू होत असलेल्या नवीन तंत्रज्ञानाबद्दल शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मोठा हातभार लावतात. या औद्योगिक भेटीमुळे इंडस्ट्रीबद्दल विद्यार्थ्यांना असणारे कुतूहल आणि शंकांचे निरसन झालेले पाहायला मिळाले. सदर औद्योगिक भेटीस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जालिंदर देशमुख यांनी भेटीस परवानगी दिली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार आणि फार्मसी (डिप्लोमा) विभागप्रमुख प्रा. जे.बी.कंदले यांचे मार्गदर्शन लाभले. या औद्योगिक भेटीसाठी प्रा. वैभव गायकवाड, प्रा. शुभांगी कागदे, प्रा. कीर्ती महामुनी या शिक्षक-शिक्षिकांसहित डिप्लोमा फार्मसी मधील ७० विद्यार्थी सहभागी झाले होते.

# आयआयटी कॉम्प्युटर सेंटरला एमएससीआयटी नंबर एकचा पुरस्कार




पंढरपूर/प्रतिनिधी : येथील अरबूज मेंशन स्टेशन रोड, आयआयटी कॉम्प्युटर सेंटरला सर्वोत्कृष्ट संगणक संस्थेचा नंबर एकचा पुरस्कार महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संचालिका वीणा कामथ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांची विभागीय मीटिंग २०२३ हॉटेल चित्रा सोलापूर येथे झाली. एमएससीआयटी मध्ये सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक प्रवेश नोंदविले तसेच राज्यात सर्वाधिक प्रवेश नोंदवणाऱ्या पहिल्या तीन सेंटरच्या यादीत समावेश झाला. एमकेसीएल कृत विविध कोर्सेसच्या माध्यमातून वर्ष २०२३ मध्ये संगणक साक्षरता आणि संगणकावर आधारित रोजगाराभिमुक व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये भरीव कामगिरी केली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व रोजगारक्षम युवा पिढी निर्मितीसाठी आणि इंडस्ट्री-रेडी असे कोर्सेस चालवून विद्यार्थ्यांना सक्षम केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल विश्र्वात प्रगती साधण्याचा आत्मविश्र्वास प्राप्त झाला. संगणक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे संचालक नितीन आसबे व सहकारी दत्ता कळकुंबे यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

गेल्या २४ वर्षापासून पंढरपूर तालुक्यातील आयआयटी ही संस्था विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचे कार्य यशस्वीरित्या करीत आहे. यापूर्वीही अनेक पुरस्कार या संस्थेला मिळाले आहेत. याचे सर्व श्रेय विद्यार्थी पालक तसेच सहकारी दत्ता कळकुंबे, रोहिणी मांजरे, वैष्णवी पाटील, प्रतीक्षा चव्हाण यांनी दिलेल्या योगदानामुळे हे यश संपादित करू शकलो असे आयआयटी कॉम्प्युटर सेंटरचे संचालक नितीन आसबे यांनी सांगितले.यावेळी एमकेसीएलचे अतुल पतोडी, दीपक पाटेकर, सोलापूर एमकेसीएलचे रोहित जेऊरकर, हारून शेख,मलिक शेख,शिवानंद पाटील, विभागीय समन्वयक महेश पत्रिके, अतुल रानडे, विवेक देसाई व सोलापूर जिल्ह्यातील सर्व कॉम्प्युटर प्रशिक्षण केंद्राचे संचालक उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुका कोळी महासंघाच्या वतीने ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बनसोडे यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुका ग्रामीण रूग्नालयाच्या नुतन अधिक्षक पदी मा श्री डॉ रविंद्रजी बनसोडे साहेब यांची नियुक्ती झाल्याने कोळी महासंघ पश्र्चिम महाराष्ट्र प्रमुख अरूणभाऊ लोणारी(कोळी)यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष संतोष पाटील यांच्या नेतृत्वात आज अक्कलकोट तालुका कोळी महासंघाच्या वतीने डॉ रविंद्र बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अक्कलकोट तालुकाध्यक्ष ऋषीभाऊ लोणारी. आर पी कोळी, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष राजेंद्र कोळी .हांजगी गावचे सरपंच उमेश पाटील . युवा आघाडीचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष देवेंद्र कोळी, उंबरगी गाव चे शाखाध्यक्ष रवी कोळी, . मैंदर्गीचे अध्यक्ष दादा कोळी. हांजगी शाखाध्यक्ष महेश कोळी, गुंडाप्पा कोळी, लक्ष्मीकांत कोळी . अंबादास करजगी. सुनील कोळी , उडगी विभागीय अध्यक्ष अंबादास (पिंटू) कोळी. ममनाबाद शाखाध्यक्ष निंगू कोळी ,महेश करजगी, शिवा कोळी व समाज बांधव व मित्रपरिवार उपस्थित होते,



अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक म्हणुन डॉ रविंद्र बनसोडे यांनी पदभार स्वीकारला या नंतर त्यांचा विविध सामजिक संस्था मंडळे आणि व्यक्तींकडून सत्कार करण्यात येत आहे , कारण डॉ रविंद्र बनसोडे हे गोरगरीब जनतेसाठी देवदूत ठरले आहेत.

# खादी ने आत्मनिर्भर भारत अभियानाला दिली नवी दिशा : मनोज कुमार

पंढरपूर/प्रतिनिधीः नव्या भारताची नवीन खादी' ने 'आत्मनिर्भर भारत अभियाना'ला नवी दिशा दिली असून, गेल्या ९ वर्षात खादी उत्पादनांच्या विक्रीत चार पटीने वाढ झाल्याने ग्रामीण भारतातील कारागीर आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाले असल्याचे केंद्रीय खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे, अध्यक्ष मनोज कुमार यांनी सांगितले.

पंढरपूर येथे खादी व ग्रामोद्योग आयोग आणि ना. रामदास आठवले युवामंच संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामोद्योग विकास योजनेतंर्गत राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेल्या १८० लाभार्थ्यांना मधुमक्षिका पालन पेटी, स्वयंचलित अगरबत्ती बनविण्याची मशीन तसेच विद्युत चलित चाकाचे वाटप अध्यक्ष मनोज कुमार यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे केंद्रीय संचालक विजय श्रीधरण, राज्य निदेशक योगेश भांबरे, सहायक निदेशक सुनील वीर, अरुण यादव, उमाकांत डोईफोडे, भैरवनाथ शुगरचे चेअरमन प्रा. शिवाजी सावंत, ना. रामदास आठवले युवामंच संस्थेचे अध्यक्ष दिपक चंदनशिवे यांच्यासह नागरिक तसेच लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री मनोज कुमार म्हणाले, आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी लघु आणि सूक्ष्म उद्योगांची मोठ्या प्रमाणावर स्थापन करण्याला तसेच खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजनांद्वारे स्वयंरोजगार निर्माण करून स्वावलंबी भारत निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. 'वोकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' मंत्रामुळे खादीला जागतिक व्यासपीठावर ओळख मिळाली आहे. गेल्या ९ वर्षात खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांच्या उलाढालीने १ कोटी ३४ लाख रुपयांचा आकडा ओलांडला आहे, तर या काळात ९ लाख ५० हजारांहून अधिक नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. खादी व ग्रामोद्योग आयोग ग्रामीण भारताच्या अर्थव्यवस्थेला बळकटी




देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्रामोद्योग विकास योजनेतंर्गत आतापर्यंत २७ हजारांहून अधिक कुंभार समाजातील बंधू-भगिनींना विद्युत चलित चाकाचे वाटप केले आहे, यामुळे त्यांच्या व्यवसायला गती मिळाली आहे. तसेच या योजनेंतर्गत ६००० हून अधिक टूलकिट्स आणि यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले आहे, तर मध अभियान योजनेंतर्गत आतापर्यंत २० हजार लाभार्थ्यांना २ लाखांहून अधिक मधमाशांच्या पेट्या आणि मधमाश्यांच्या वसाहतींचे वाटप करण्यात आले आहे. सध्या देशभरात ३ हजारांहून अधिक खादी संस्था कार्यरत आहेत, ज्याद्वारे ५ लाखांहून अधिक खादी कारागीर आणि कामगारांना रोजगार मिळत आहे. महाराष्ट्रातील ३१ खादी संस्थांच्या माध्यमातून १ हजार ४०० हून अधिक कारागिरांना रोजगार मिळत आहे. गेल्या आर्थिक वर्षात येथील ६० खादी आऊटलेट्सवर २६ कोटींहून अधिक खादीची विक्री झाली आहे. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या माध्यमातून खादी आणि ग्रामोद्योग आयोग ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे. गेल्या ८ वर्षांत पीएमईजीपीच्या माध्यमातून महाराष्ट्रात २६ हजार ३७५ नवीन युनिट्सची स्थापना करण्यात आली आहे, ज्यासाठी भारत सरकारने सुमारे ८०२ कोटी ५१ लाख रुपयांची मार्जिन मनी अनुदान वितरित केले आहे. या नवीन युनिट्सच्या माध्यमातून महाराष्ट्रात २ लाख ११ हजार नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या असल्याचे श्री मनोज कुमार यांनी सांगितले.

यावेळी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि दादरा आणि नगर हवेली येथील २२६ युनिटची स्थापना करण्यात येणार असून त्यांना ९ कोटी ७ लाख रुपयाचे मार्जिन मनी अनुदान अध्यक्ष मनोज कुमार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने वितरीत करण्यात आले. यामध्ये २ हजार ४८६ जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. खादी-ग्रामोद्योग कार्यक्रमाशी संबंधित कामगारांच्या हातात जास्तीत जास्त पैसा देण्याचा, त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत वाढवून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी स्वदेशी उत्पादनाची खरेदी करावी तसेच विक्रेत्यांनी देशात उत्पादीत झालेल्या मालाची विक्री करावी असे आवाहन खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे, अध्यक्ष मनोज कुमार यांनी केले आहे.

# आदर्श शिक्षक अनिल क्षिरसागर यांना राज्यस्तरीय आसः अध्यापक पुरस्कार जाहीर

कळंब/सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद प्रशाला इटकूर ता.कळंब येथील उपक्रमशील शिक्षक अनिल सोमनाथ क्षिरसागर यांना आसः अध्ययन -अध्यापन-संघर्ष नांदेड यांचा राज्यस्तरीय अध्यापक पुरस्कार मिळाला असून ३१ डिसेंबर २०२३ रोजी पुरस्कार वितरण होणार आहे. अनिल क्षिरसागर यांचे ग्रामीण भागातील मुलांसाठी स्पर्धा परीक्षांसाठी केलेले उल्लेखनीय कार्य पाहून त्यांचा हा गौरव केला जात आहे. त्याची एकूण सेवा १६ वर्षे झाली असून आतापर्यंत त्यांनी एकूण ४६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक केले असून त्यात इटकूर येथील २२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयोगी नवोदय विद्यालयासाठी एकूण २२ विद्यार्थी प्रवेशित झाले असून त्यापैकी १०



विद्यार्थी इटकूर गावचे आहेत. त्याचप्रमाणे सातारा सैनिक स्कूल साठी पहिल्याच प्रयत्नात ८ विद्यार्थी पात्र झाले आहेत. या सर्व बाबींची दखल घेत अनिल क्षिरसागर यांना आस या संघटनेचा राज्यस्तरीय अध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे, त्याबद्दल त्यांचे जिल्हा परिषद प्रशाला ईटकुर चे मुख्याध्यापक गरुडे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले, उपाध्यक्ष प्रभाकर आडसूळ, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, ग्रामस्थ व तालुक्यातून सर्व स्तरातून कौतुक होत आहे.